# घरे उभारण्यात अपयश

## 'एसआरए' आणि महापालिकेवर प्रधान सचिव नितीन करीर यांची टीका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'शहरातील झोपडपट्ट्यांचा सर्व्हे करून पात्र नागरिकांच्या माहितीद्वारे नागरिकांसाठी प्रत्यक्ष घरे साकारण्याचा विचार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) तयार करताना होता. मात्र, दुर्दैवाने गेल्या १४ वर्षांत 'एसआरए' आणि महापालिकेने ते काम केले नाही. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील झोपडपट्ट्यांचा सर्व्हे करून त्या वेळी तयार केलेले पुस्तक आजही आपण दिमाखात मिरवत आहोत,' असा टोला लगावून नगरविकास खात्याचे प्रधान सचिव नितीन करीर यांनी वेळीच सावध होण्याचा इशारा दिला आहे. पुनर्वसनाबाबत वेळीच काही केले नाही तर दहा वर्षांनंतर शहराचे सामाजिक स्वास्थ अत्यंत अडचणीत येणार असल्याची भीतीही त्यांनी शनिवारी व्यक्त केली.



नितीन करीर

### 'वेळीच पावले उचला'

'गेल्या १४ वर्षांत 'एसआरए' आणि पालिकेने अपेक्षेप्रमाणे काम केलेले नाही. सर्व्हे करून पात्र नागरिक आणि प्रकल्पांचा हिशेब वेळीच मांडला गेला असता तर अनेक प्रकल्प मार्ग लागले असते,' अशी खंत नगरविकास खात्याचे प्रधान सचिव नितीन करीर यांनी व्यक्त केली.

करीर यांच्या हस्ते दांडेकर पूल येथील पटेलनगर येथील 'नाईकनवरे डेव्हलपर्स' यांनी बांधलेल्या 'एसआरए' प्रकल्पाचा हस्तांतर कार्यक्रम पार पाडला. या प्रसंगी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, महापालिका आयुक्त सौरभ राव, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, हेमंत नाईकनवरे, बांधकाम व्यावसायिक सतीश मगर, आर्किटेक्ट संदीप महाजन, रणजित नाईकनवरे, नगरसेवक धीरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे आदी उपस्थित होते. करीर यांनी सुरुवातीलाच आपण जाहीर कार्यक्रमांना जाण्याचे टाळत असल्याचे सांगितले.

पुण्यात 'एसआरए'चे कार्यालय सुरू करताना नागरिक आणि विकासक यांच्यात दुवा बांधण्याचे काम या यंत्रणेकडून अपेक्षित होते. मात्र, या यंत्रणेकडून केवळ विकासकाने सादर केलेल्या प्रकल्पांची पात्रता तपासणे आणि त्या फाइल खाली-वर करण्यापलीकडे काही झालेले नाही. 'एसआरए'ने पात्र नागरिकांच्या माहितीच्या आधारे विकासक आणि नागरिकांमध्ये प्रत्यक्षात घरे साकारू शकतील, याचे गणित मांडणे अपेक्षित होते. हा हिशेब जाहीररीत्या मांडला गेला असता तर अनेक प्रकल्प मार्गी लागले असते,' अशी खंतही करीर यांनी व्यक्त केली. हे अर्धवट राहिलेले काम एसआरए आणि महापालिकेने येत्या वर्षभरात पूर्ण करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

विकासकांसाठी 'एसआरए' प्रकल्प तोट्याचा नाही. कदाचित फार पैसे मिळत नसतील परंतु तो तोट्याचा नाहीच, हे ठणकावून सांगताना करीर यांनी 'क्रेडाई'च्या सदस्यांना प्रत्येकाने 'एसआरए'चा एक प्रकल्प राबवावा, असे आवाहनही केले. 'एसआरए'चे नियम चार वर्षांपूर्वी खूप चांगले होते, असे लोक म्हणतात. त्या वेळी किती आणि आता किती प्रकल्प आहेत, याची आकडेवारी सर्वांचीच तोंडपाठ आहे. नफ्यात थोडा तोटा सहन केला गेला, तर हे प्रकल्प मार्गी लागतील. त्यासाठी पालिका आणि 'एसआरए'ने नागरिक आणि विकासकांमधील पूल झाले पाहिजे, अशी सूचनाही त्यांनी केली. सभागृह नेते भिमाले, आर्किटेक्ट महाजन, नाईकनवरे आदींची भाषणे या वेळी झाली. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.